**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2021, VOL- 9/67*

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव : एक चिंतन

**राजेंद्र महादू आचार्य, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभागप्रमुख, द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव- रायगड ४०२१०४*

*acharyarajendra584@gmail.com*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

## १. प्रस्तावना

" गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार
अन वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार
खळखळू द्या या अद्य शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारात ?
पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती
कधि न थांबले विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार " १

क्रांतिकवी कुसुमाग्रजांनी १९३९ मध्ये वयाच्या अगदी विशीत हे क्रांतिगीत लिहिले आहे. १९४२ च्या ' छोडो भारत ' (Quite India) आंदोलनात या गीताने भारतातील तरुणांच्या हृदयावर अधिराज्य केले. या क्रांतिकारकांनी देशासाठी हसतमुखाने व अभिमानाने हौतात्म्य पत्करले. हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल, हुतात्मा अश्फाकउल्ला खान, हुतात्मा राजेंद्र लाहिरी, हुतात्मा ठाकूर रोशनलाल, हुतात्मा जतीनदास, हुतात्मा चंद्रशेखर आझाद, हुतात्मा भगतसिंह, हुतात्मा राजगुरू, हुतात्मा सुखदेव, हुतात्मा महावीरसिंग ही त्यातली काही दैदिप्यमान नावे. ते महात्मे आपले दिव्य करून गेले त्यांच्या बलिदानाची महती गाणारे हे क्रांतिगीत आहे. ज्यांच्यामुळे मला स्वातंत्र्याचा आनंद, अनुभव आणि अनुभूती प्रत्येक सेकंदाला मिळते. त्या सर्व क्रांतिकारकांना आणि स्वातंत्र्यवीरांना मी पंचांग प्रणाम करतो.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्य बलिदानाचे सार्थक झाले आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले. अनेक धर्म, हजारो जाती, अगणित भाषा, आहारविहार, आचारविचार, विविध वेषभूषा अशा विविधतेने नटलेल्या भारताला भारतीय संविधानाच्या एका छत्राखाली आणून सामाजिक व आर्थिक न्याय देणारा,

स्वातंत्र्य आणि समतेची कास धरणारा, एकता आणि एकात्मता जोपासणारा एक जिवंत दस्तऐवज घटना समितीने स्वीकारला. लोकांमध्ये विश्वास, सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी आणि खरे सार्वभौमत्व हे जनतेच्या हाती आणण्यासाठी भारताने लोकशाही शासनव्यवस्था स्वीकारली. या लोकशाही शासनव्यवस्थेच्या माध्यमातून आजतागायत आपल्या देशाचा राज्यकारभार चालू आहे आणि पुढेही चालू राहील. १५ ऑगस्ट २०२१ रोजी आपण सगळेच भारतीय आपल्या स्वातंत्र्याचा ' अमृत महोत्सव ' साजरा करीत आहोत. बघता बघता या स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षाचा झाला आहे. आगामी २५ वर्षानंतर भारत 'शताब्दी वर्ष समारोह' साजरा करील. त्यावेळी भारत एका विश्वगुरूच्या भूमिकेत असेल असा आशावाद मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी अनेक क्षेत्रात कार्य सुरू आहे.

एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी त्या देशातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणे, या घटनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. स्वातंत्र्याविषयी आपली कोणती स्वप्ने होती ? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या ? आज वास्तव काय आहे ? आपण काल कोठे होतो आणि आज कुठे आहोत ? आपल्या कोणत्या उणीवा राहिल्या आहेत त्यांची भरपाई कशी करता येईल ? भविष्यात कशी पावले उचलावी लागतील ? याचा विचार आपल्याला या अमृतमहोत्सवी वर्षात करावा लागेल. येणाऱ्या काही काळामध्ये आपल्याला काही संकल्प करावे लागतील आणि ते नेटाने सिद्धीस नेण्यासाठी आणखी नव्या उमेदीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सक्रिय व्हावे लागणार आहे.

१९३२ मध्ये भारताला संविधानिक सुधारणा देण्यासंबंधी गठित केलेल्या समितीसाठी तयार केलेल्या सहा पानी टिपणामध्ये इंग्लंडचे प्रधानमंत्री विस्टन चर्चिल म्हणतात की, " भारत न एक देश है या राष्ट्र है। यह एक महाद्वीप है। जिसमे कही देश बसे हुए है। . . . भारत कभी भी एक स्वतंत्र देश नही हो सकता। जिसे लोग देख सके। " २ परंतु गेल्या ७५ वर्षांमध्ये भारताने केलेली प्रगती पाहता, भारताने सर केलेली यशस्वितेची शिखरे पाहता विस्टन चर्चिल यांचे मत भारताने खोटे ठरविले आहे. कारण आज ज्ञान-विज्ञान, दळणवळण, दूरसंचार, व्यापार, अन्नधान्य, कला, क्रीडा, साहित्य या क्षेत्रामध्ये आपण विकासाच्या उच्च शिखरावर जाऊन पोहोचलो आहोत. ज्यामुळे आपला भौतिक, आध्यात्मिक आणि आत्मिक विकास घडून आला आहे.

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मुबलक मनुष्यबळ या दृष्टीने समृद्ध असा एक देश आहे.त्यामुळे चौफेर विकासाला येथे खुप मोठी संधी आहे. एकंदरीत अशी परिस्थिती असताना काही क्षेत्रांमध्ये आपल्याकडून काही उणिवा राहून गेल्या आहेत . अमृतमहोत्सवी भारतापुढे त्या समस्या सोडविण्याचे एक आव्हानच आहे.

गेल्या ७५ वर्षांत भारताने अतिशय बिकट परिस्थितीतून मार्गक्रमण केले आहे. अनेक समस्या, अडचणी आणि प्रश्न हाताळले आहेत. या वाटचालीचे आपणांस १९४७ ते आजच्या बिंदूपर्यंत चार - पाच टप्पे करता येतील.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२) भारताच्या वाटचालीतील टप्पे**

**१) १९४७ ते १९६१**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले परंतु भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाली. आपल्या भारताच्या भूमीवर पाकिस्तान हे नवे राष्ट्र निर्माण झाले. त्यामुळे देशाच्या पूर्व आणि पश्चिम भागातील बराचसा भूभाग आणि मनुष्यबळ यांचा आपल्याला त्याग करावा लागला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवस्वतंत्र भारतासमोर अनेक प्रश्न होते. या पहिल्या टप्प्यात भारत - पाकिस्तान फाळणी, महात्मा गांधीची हत्या, भारतीय संविधानाची निर्मिती, संस्थानांचे भारतीय संघराज्यातील विलीनीकरण, पाटबंधारे, विद्युतनिर्मिती इत्यादी महत्त्वाचे प्रश्न आणि आव्हाने नवस्वतंत्र भारतासमोर होते. यासाठी संविधान सभेची स्थापना करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी जगातील सर्वात मोठ्या संविधानाचा अंगीकार करण्यात आला. भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाने भारतीय नागरिकांना मौलिक मुलभूत अधिकार आणि कर्तव्य प्रदान केले. जम्मू व काश्मीर, हैदराबाद आणि जुनागड या तीन संस्थानाने वगळता सगळे संस्थाने संघराज्यात विलिन झाले. कालांतराने भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली या संस्थानांचेही भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाले, मात्र काश्मीरचा मुद्दा अनेक वर्ष भारताच्या गळ्यातला फास बनून राहिला होता. हा प्रश्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी (३१ऑक्टोबर २०१९ रोजी) जम्मू व काश्मीरला केंद्रशासित प्रदेशामध्ये सहभागी करून सोडविला आहे. त्याचप्रमाणे अयोध्येतील राममंदिराचा प्रश्नही मार्गी लागला आहे. याच काळात पहिली ते आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले. थोडक्यात भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने पायाभरणी करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले.

२) १९६२ ते १९८० - या काळात युद्ध, दुष्काळ, आणीबाणी अशा प्रसंगाचा भारताला सामना करावा लागला.१९६६ मध्ये हरितक्रांतीची रूपरेषा प्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ नॉरमन बोरलॉग यांनी तयार केली परंतु ती लागू करण्याचे श्रेय सी. सुब्रमण्यम यांना दिले जाते. त्यांच्यासोबत प्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांनी एकत्रित कार्य केले. त्यावेळी पुरवठा मंत्री बाबू जगजीवनराम आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे होते. १९९५- ९६ मध्ये दुसऱ्या हरितक्रांतीचा उल्लेख प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी केला. २००२ मध्ये राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी तिला नवे परिमाण दिले. या हरितक्रांतीची १३५ कोटी लोकांचे उदरभरण करण्यास मदत झाली. या हरित क्रांतीमुळे आज आपण अन्नधान्याच्या बाबतीत सक्षम झालो आहोत. याच काळात १३ जानेवारी १९७० पासून श्वेत/ धवलक्रांती किंवा दुग्ध क्रांती घडून आली.

भारत-पाकिस्तान, भारत-चीन, या देशांतर्गत सीमा प्रश्नाने मोठे उग्र रूप धारण केले. त्यामुळे सन १९६५ मध्ये चीन - भारत यांच्यात युद्ध झाले तर पाकिस्तान - भारत यांच्यात १९४८, १९६५, १९७१ आणि १९९९ असे चार वेळा युद्ध करावे लागले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आजपर्यंत अनेक दुष्काळ देशाने पाहिले आहेत.१९७२ चा दुष्काळ असाच मोठा दुष्काळ होता. त्या काळात सलग तीन वर्ष पीक हाती आलेच नाही. महाराष्ट्राच्या शासकीय व प्रशासकीय व्यवस्थेला १९७२ च्या दुष्काळाने हलवून टाकले.हा दुष्काळ केवळ १९७२ चा नव्हता त्याची प्रक्रिया

१९७० पासून सुरु झाली होती. पिण्याच्या पाण्याचा अभाव, गुरांच्या चारा- पाण्याचा प्रश्न त्यामुळे त्यांना छावणीत नेऊन ठेवण्याची वेळ, ग्रामीण भागात रोजगाराचा अभाव व त्यामुळे जवळच्या शहराकडे ग्रामस्थांची होणारी वाटचाल या वर्षीच्या दुष्काळाची वैशिष्ट्ये दिसून येतात.त्यावेळी सरकारने सर्वसामान्यांना धीर दिला. सरकारसह विविध संस्था, संघटनांनी केलेल्या मदतीचे तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी कौतुक केले होते.

३) १९७९ ते १९९३ या काळात संगणक, माहिती - तंत्रज्ञान आणि दूरसंचार क्षेत्रात प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी भरीव योगदान दिले. त्यांनी डिजिटल क्रांतीचा पाया रचला आहे. परंतु भारताच्या एकात्मतेला आणि एकसंघतेला धोका निर्माण होईल अशा या फुटीरतावादी आणि जमातवादी चळवळीचा भारतात उद्रेक झाला आहे.

४) १९९१ ते २०२० जागतिकीकरणानंतर बदललेला आणि नवी आर्थिक व्यवस्था स्वीकारलेला भारत अतिशय आत्मविश्वासपूर्ण या काळात भारताने पावले टाकून भारताला विकसनशील राष्ट्र म्हणून नावारूपाला आणले.याच काळात ३० सप्टेंबर १९९३ रोजी महाराष्ट्रात आणि २६ जाने २००१ रोजी गुजरातमध्ये भूज, कच्छ येथे मोठे भूकंप झाले. त्यात देशाचे मोठे नुकसान झाले. तसेच याच काळात भारताच्या पहिल्या स्वदेशी उपग्रह प्रक्षेपण वाहनाचे आणि रोहिणी उपग्रह यशस्वीपणे पृथ्वीच्या कक्षेत तैनात केलेले तसेच Indian Space research organization and defense research and development organization या दोन्ही संस्थांमध्ये Aerospace Engineer म्हणून काम केलेले आणि २००२ ते २००६ या काळात भारताचे ११ वे राष्ट्रपती होऊन गेले. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारत २०२० पर्यंत जागतिक महासत्ता होणार असे भाकीत केले आहे.

४) २०२२ - २१ या काळामध्ये सन १९९१ मध्ये जागतिक बँकेकडून कर्ज घेणारा भारत हा आर्थिक क्षेत्रामध्ये स्थैर्य निर्माण करण्यासाठी ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो आहे. सन १९४७ मध्ये अन्नधान्य आयात करणारा भारत आजच्या काळात अन्नधान्याच्या क्षेत्रात Food security to Food export कडे वळला आहे. शस्त्रास्त्रांच्या बाबतीत आपण स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत आहोत. आज आपण COD, जी -२०, (जी - २० ची परिषद २०२२ भारतात होणार असल्याचे अमृत महोत्सव वर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे.) सार्क (SAARC) यासारख्या अनेक आंतरराष्ट्रीय संघटनामध्ये भारताने मानाचे स्थान मिळविले आहे. या संघटनाच्या माध्यमातून भारत आपली भूमिका जागतिक पटलावर मांडताना दिसत आहे. त्यामुळे ही सर्व यशस्वितेचे शिखरे या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत गाठली आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आपली गणना विकसनशील देशांमध्ये केली जात आहे परंतु आता भारताला विकसित राष्ट्र अर्थातच महासत्ता बनवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या कालातील कोविड १९ ही जागतिक महामारी कोणीही विसरू शकत नाही. आजवर आपण अनेक धोरणे स्वीकारली, योजना राबविल्या, आपण यशस्वितेच्या शिखरावर पोहोचलो. अनेक आव्हानांना परतवून लावून भारताने फार मोठी प्रगती साधली असली तरी महासत्ता बनण्यासाठी काही आव्हाने आजही भारतासमोर आहेत. ती आव्हाने आपण समजून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**३) भारतासमोरील आव्हाने**

१) स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वावर आपल्या भारताची उभारणी झाली होती. त्या मूलभूत तत्त्वांचा आणि भारतीय संविधानाचा आजच्या काळात विसर पडत चाललेला आहे. ज्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर भारत उभा राहिला होता, त्याच भारतात धार्मिक कट्टरतावादाचे आव्हान येऊन ठेपले आहे. इतकेच नव्हे तर समाजातल्या शेवटच्या व्यक्ती पर्यंत विकासाची गंगा पोहोचली  पाहिजे, तसेच खेड्याकडे चला असे सांगून आत्मनिर्भर भारत बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महात्मा गांधीच्या देशात आज गरीबांचा भारत आणि श्रीमंताचा शायनिंग इंडिया अशी आर्थिक व सामाजिक विषमतेची परिस्थिती निर्माण झाली आहे.

२) 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफल: क्रियाः ।।
मनुस्मृति ३/५६

म्हणजे जेथे स्त्रियांचा मान - सन्मान होतो, तिची पूजा केली जाते तेथे देवता निवास करतात आणि जिथे स्त्रियांचा अनादर होतो, त्यांना पूजले जात नाही तेथे केलेली सर्व कामे निष्फळ ठरतात. हा विचार सांगणाऱ्या भारतातच महिला सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

३) १९४७ चा भारत आणि २०२१ चा भारत यामध्ये आता बराच फरक पडला आहे. गेल्या ७४ वर्षात भारताने अनेक क्षेत्रात खूप मोठी प्रगती केली आहे. परंतु ती प्रगती अपेक्षेप्रमाणे, क्षमतेप्रमाणे व्हायला पाहिजे होती त्या क्षमतेने झाली नाही असे वाटते. आज देशाची एकूण लोकसंख्या एकशे पस्तीस कोटींच्या आसपास असून त्यात बहुसंख्य तरुण वर्ग आहे मात्र त्यांच्या क्षमतेचा पुरेपूर उपयोग या देशात केला जातो असे वाटत नाही.अनेक उच्चशिक्षित तरुणांचा कल परदेशी स्थायिक होण्याकडे आहे कारण आजही रस्ते, वीज, पाणी, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण यासारख्या मुलभूत क्षेत्रात इतर देशांच्या मानाने भारत मागे आहे. भारतातील अनेक गावात जायला व्यवस्थित रस्ता नाही असला तरी रस्त्यात खड्डे  आहेत. गावांमध्ये २४ तास वीज आणि पाणी देणे अजून शक्य झालेले नाही. त्याकडे आणखी विशेष लक्ष द्यावे लागेल.

४) आज एखादा सामान्य माणूस निवडणूक लढविण्याचा विचार देखील करू शकत नाही. मात्र तुरूंगात असणारे गुन्हेगार निवडणूक लढवतात आणि विशेष म्हणजे ते जिंकतातही ! आज प्रत्येक कार्यकर्त्याने आपापले साहेब, दादा, भाऊ ठरवून घेतले आहेत. ते म्हणतील तेच खरे! अशी परिस्थिती आहे. त्यामुळे कार्यकर्ते एकमेकांची डोकी फोडायला देखील मागे पुढे पहात नाहीत. तेव्हा 'जळणारी झोपडी आणि सांडणारे रक्त' हे शेवटी भारतीयच आहे हे आपण का बरे विसरतो ! पण आज एकमेकांना शिव्या घालणारे हेच साहेब, दादा, भाऊ उद्या राजकीय अपरिहार्यतेचे कारण सांगून विरोधकांच्या मांडीला मांडी लावून बसतात. तेव्हा कार्यकर्त्यांना हसावे की रडावे तेच कळत नाही. त्यामुळे अशा स्वार्थी राजकारण्यांची गुलामगिरी करणे सोडून नागरिकांनी स्वतंत्र विचार करायला शिकले पाहिजे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

५) भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे आपल्या देशाची व्यवस्था पोखरली आहे. रोज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते. तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे. तेच हात भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी ही मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे, परंतु अशा दुष्ट प्रवृत्तीमुळे देशाची अधोगती होते.

६) आज चीन,पाकिस्तानसारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. आपल्या देशावर होणारे त्यांचे हल्ले वेदनादायक ठरतात.

७) शेतकरी हा सबंध राष्ट्राचा पोशिंदा आहे. तो आपल्या घामातून मोती पिकवितो. एका दाण्याचे शंभर दाणे करण्याचे सामर्थ्य त्याच्यामध्ये आहे. आपल्या देशातील एकशे पस्तीस कोटी लोकांना पुरून उरेल इतके अन्नधान्य तो पिकवितो. तरीही आपल्या शेतकऱ्यांना हक्कासाठी वर्ष-वर्ष आंदोलन करावे लागते. त्यांचे हित जोपासणारी व्यवस्था आगामी काळात उभारावी लागेल.

८) पर्यावरणाचा ढासळणारा समतोल - जगातील प्रत्येक देश विकासाकडे वाटचाल करत असताना पर्यावरण संवर्धनाकडे जाणीवपूर्वक लक्ष घालत आहेत कारण पर्यावरण हा देशाच्या विकासात सर्वात महत्त्वाचा भाग असतो. पण नेमके उलट चित्र आपल्या देशात दिसत आहे. जगातील छोटे छोटे देश पर्यावरणीय जागतिक आकडेवारीत पुढे पुढे आले आहेत. पर्यावरण निर्देशांकानुसार जर पाहिले तर भारत या यादीत १५५ व्या स्थानावर आहे. स्विझरलँडसारखा छोटा देश हा जगात पर्यावरण निर्देशांकात एक नंबरला आहे. ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, जर्मनी, इंग्लंड, कॅनडा, जपान, फ्रान्स, अमेरिका, रशिया, ब्राझील यासारखे देश पर्यावरण संवर्धनामुळे जगात पुढे आहेत. आपल्या देशात मात्र आर्थिक व राजकीय अस्थिरता, पर्यावरण संवर्धनाला दिलेले दुय्यम स्थान, पर्यावरणविषयक जाणीव जागृतीचा अभाव, इत्यादी कारणामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे.

९) आपल्या देशात बेरोजगारीची समस्या, नागरिकांचे अनारोग्य मोठ्या प्रमाणात दिसतात. तसेच कुपोषणाचे बळीही दिसून येत आहेत. जागतिक जनगणनेनुसार भारतात सन २००० साली ४७ टक्के बालके कुपोषित म्हणजे सर्वसामान्य मुलांपेक्षा कमी वजनाचे आहे. 'द हिंदू' या राष्ट्रीय वृत्तपत्रात फेब्रुवारी २०१० च्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य पाहणीनुसार एकट्या पुरोगामी महाराष्ट्रात दर वर्षी साधारण ४५००० बालके या कुपोषणाचे बळी ठरतात. देशपातळीवर महाराष्ट्रात ११ टक्के कुपोषणाचे प्रमाण आहे. आजही आदिवासी भागात नीटनेटके रस्ते, दवाखाने नाहीत. शिक्षणाच्या सुविधा नाहीत.

१०) भारताच्या संविधानाच्या अंमलबजावणीनंतर अजूनही अडसर आहेत ते म्हणजे अंधश्रद्धा, जातीव्यवस्था! जातीव्यवस्थे संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "अमेरिकेत जातीची समस्या नाही.भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट त्या समाजजीवनात विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती - जातीमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्रनिर्मितीनंतरच बंधुत्व वास्तवात पाहिला

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरासारखा केवळ बाह्य देखावा असेल. "३ भारतीय माणूस जातीजातीमध्ये विभागला गेला आहे. अनादी काळापासून चालत आलेल्या इथल्या व्यवस्थेने आम्हाला जाती-धर्मांमध्ये एवढे गुरफटून टाकलेले आहे की, आम्ही या सगळ्यांच्या नादी लागून आमच्या प्रगतीला बाधा निर्माण केली आहे.

स्वतंत्र भारतातील लोकशाहीविषयी चिंतन करताना, देशाच्या भवितव्याविषयी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील भाषणात आपल्या भावना व आपले विचार व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "जोपर्यंत इंग्रज सरकार होते तोपर्यंत आपल्या देशातील चांगल्या वाईट गोष्टीची जबाबदारी आपण त्यांच्यावरच टाकत होतो. पण आता आपण स्वतंत्र झाल्यामुळे चांगल्या वाईट गोष्टीची जबाबदारी आपलीच राहणार आहे. त्यामुळे आपल्याला आता अधिक जबाबदारीने वागावे लागणार आहे." नंतर देशाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, " भारताचे स्वातंत्र्य आपल्याच लोकांच्या विश्वासघाताने अनेकदा गेले आहे. आपल्याच लोकांनी देशद्रोह केला आणि भारत देश दुसऱ्याच्या हाती दिला. महंमद बिन कासिमने जेव्हा सिंधवर स्वारी केली तेव्हा राजा दाहीरच्या सेनापतीने लाच घेतली आणि तो आपल्या राजाच्या मदतीला धावला नाही. त्यामुळे राजा दाहीरचा पराभव झाला. महंमद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे आमंत्रण राजा जयचंदने दिले. शिवाजी महाराज स्वराज्यासाठी लढत होते तेव्हा इतर मराठे सरदार शिवाजी महाराजांविरुद्ध लढत राहिले. आता पुन्हा तसेच होणार नाही ना ? अशी मला चिंता वाटते. जर राजकीय नेत्यांनी आपल्या पक्षाचे मत हे राष्ट्रहितापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारताचे स्वातंत्र्य पुन्हा धोक्यात येईल.असे झाले तर पुन्हा स्वातंत्र्य मिळविणे अशक्यच होऊन बसेल. यासाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे. मी हिंदू, मी मुसलमान, मी ख्रिश्चन, मी शिख, मी जैन - बौद्ध यांना दुय्यमत्व देऊन मी प्रथम भारतीय आहे व अंतिमतःही भारतीयच आहे. असे आपण मानलेच पाहिजे. "४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या शब्दा शब्दात राष्ट्रप्रेम वास करीत आहे. असे देशप्रेम प्रत्येक नागरिकाला वाटणे आवश्यक आहे. त्यामुळे ते केवळ दलितांचे किंवा संविधानाचे निर्माते नसून आधुनिक भारताचे प्रमुख निर्माता होते. अशी अनेक आव्हाने भारतापुढे उभी ठाकली आहेत. या आव्हानावर आता मात करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य महोत्सवी वर्षानंतर आपली वाटचाल शताब्दी वर्षाकडे, विकसनशील देशाकडून - विकसित देशाकडे अर्थात महासत्ता देशांच्या रांगेत जाऊन बसण्यासाठी प्रत्येकाने एकत्रित येण्याची गरज आहे.

## ४) संदर्भग्रंथ

*शिरवाडकर वि.वा. - विशाखा , कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे*
*गुहा रामचंद्र - भारत को लेकर चर्चिल कितने गलत थे, अमर उजाला, ब्लॉग लेखन २४ फेब्रुवारी २०१९.*
*डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३ १९४६ – १९५६*
*गायकवाड राजवंश, डॉ. ज्ञानराज काशिनाथ (२०१६) महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, रिया प्रकाशन कोल्हापूर पृ. ३०७,३०८*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*